प्रेसनोट

१८/०७/२०१९

# फसवणुकीची रक्कम ३ कोटी ४१ लाख रुपये अर्जदार कंपनीस परत मिळवुन देण्यात सायबर पोलिस स्टेशन यशस्वी

पुणे शहरातील एस आर सी केमिकल प्रा.लि. कंपनीचे दि. १४/०६/२०१९ रोजी १६६२७६.२५ युएसडी डॉलर व दि. १८/०६/२०१९ रोजी ३२९४०५.८५ युएसडी डॉलर एचडीएफसी बँकेतुन मेक्सीको येथील बँको मर्कंटाईल डेल नॉर्टे (बेनॉर्टे) बँक मध्ये भारतीय चलनामध्ये रुपये ३.४१ कोटी पाठवण्यात आले होते. रक्कम पाठवल्यानंतर, ज्या ईमेल द्वारे रक्कम पाठवली तो ई-मेल बनावट असल्याचे निदर्शनास आल्याने सदर रकमेची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने सायबर पोलीस स्टेशन, शिवाजीनगर येथे दि. २०/०६/२०१९ रोजी तक्रारी दाखल केली होती.

सदरची तक्रार प्राप्त झाल्यानंतर सायबर पोलीस स्टेशन येथील अधिकारी यांनी तात्काळ मेक्सीको येथील बँको मर्कंटाईल डेल नॉर्टे (बेनॉर्टे) बँकेला, तक्रारदार यांचे अकाऊंट असणाऱ्या एचडीएफसी बँक, तसेच हे स्वीफ्ट ट्रान्झॅक्शन जे.पी. मॉर्गन बँके मार्फत झाल्याने त्यांना घडलेल्या घटनेबाबत व सदरचे ट्रान्झॅक्शन फसवणुकीने झाले असले बाबतच्या पुराव्यांसहीत पत्रव्यवहार करुन त्याचा पाठपुरावा केला.

या प्रयत्नांमुळे दि.११/०७/२०१९ रोजी फसवणुक झालेली रक्कम ३ कोटी ४१ लाख रुपये नमुद बँकेकडुन तक्रारदार यांना रिफंड करण्यात येणार असंलेबाबत बँकेकडुन पत्रव्यवहार प्राप्त झाला आहे.

सदरचा प्रकार हा सायबर क्राईममध्ये मॅन इन मिडल या नावाने ओळखला जातो.

**मॅन इन मिडल –**

माहिती तंत्रज्ञान व संपर्क साधनांच्या प्रगतीमुळे सामान्यतः उद्योग क्षेत्रात पुरवठादार व मागणीदार यांचेत होणारा व्यवहार हा ईमेल वर चालतो. या दोघांपैकी कोणत्याही एकाचा ईमेल हॅक झाल्यास हॅकरला या दोघांमध्ये होणाऱ्या संभाषणा बाबत व आर्थिक व्यवहाराबाबत संपुर्ण माहिती मिळते. याच माहितीचा वापर करुन हॅकर फसवणुक करतात. जेव्हा पुरवठादार आणि मागणीदार यांचेत एखादा व्यवहार ठरतो त्यावेळी हॅकर मागणीदाराला पुरवठादाराच्या ईमेल आयडी सारखा, ज्यात नावाचे स्पेलिंग मध्ये सहजासहजी ओळखु न येणारा बदल करुन, पुरवठादाराची ओळख धारण करुन मागणीदारास संपर्क केला जातो. त्यास पुरवठादाराचे मुळ बँक खाते हे काही कारणास्तव वापरता येणार नसल्याचे सांगुन हॅकर त्याचे बँक खाते पुरवठादाराचे

म्हणुन मागणीदारास पाठवितो. ईमेल आयडी मधील झालेला बदल मागणीदाराच्या सहजासहजी लक्षात न आल्याने तो सदर बँक अकाऊंट मध्ये त्याने मागणी केलेल्या वस्तु अगर सेवा साठीची रक्कम पाठवितो.

अशा प्रकारे दोघांचे ईमेल संभाषण प्राप्त करुन खोटी ओळख धारण करुन फसवणुक करण्याचे प्रकाराला मॅन इन मिडल असे म्हणतात. सायबर पोलीस स्टेशन ने या पुर्वी अशाच एका प्रकारामध्ये पुण्यातील एका नामांकित कंपनीला त्यांचे ४.५ कोटी रुपये परत मिळवुन देण्यात यश मिळविले होते.

**सुरक्षेचे उपाय –**

१. जे उद्योजक वस्तु अगर सेवांकरिता भारतातील किंवा भारता बाहेरील पुरवठादारांशी ईमेल वर संपर्कात आहेत त्यांनी पैसे पाठविण्या पुर्वी संबधित पुरवठादाराशी फोनद्वारे संपर्क करुन बँक अकाऊंट नंबरची खात्री केल्यानंतरच ठरलेली रक्कम पाठवावी.
२. आपले ईमेल अकाऊंट सुरक्षीत करुन वेळोवेळी त्याचे सुरक्षेचा आढावा घ्यावा.
३. आपणास जर अशा पध्दतीने खोटी ओळख धारण करुन बँक अकाऊंट बदललेबाबत ईमेल प्राप्त झाला असेल किंवा आपण त्यावरुन पैसे पाठविले असल्यास त्वरित सायबर पोलीस स्टेशनशी संपर्क करावा.

तक्रारदार यांनी मा. पोलीस आयुक्तांची प्रत्यक्ष भेट घेवुन झाले कामगिरी बाबत अभिनंदन करुन त्यांचे आभार मानले.

वरील कामगिरी श्री. संभाजी कदम, पोलीस उपआयुक्त, आर्थिक व सायबर, श्री निलेश मोरे, सहा पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर कडील वरिष्ठ पोलीस निरिक्षक जयराम पायगुडे, सहा. पोलीस निरिक्षक सागर पानमंद, पो.शि. प्रसाद पोतदार यांनी केली आहे.